# स्वातंत्र्यवीर सावरकर यांची दुर्मिळ पुस्तके संकेतस्थळावर

**बुक गंगा डॉट कॉमचा अभिनव उपक्रम**

क्रांतिकारांचे मुकुटमणी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची सर्व ३८ पुस्तके संकेतस्थळावर उपलब्ध झाली आहेत. यात सावरकर यांच्या चार दुर्मिळ पुस्तकांचाही समावेश आहे. बुकगंगा डॉट कॉमने सावरकर प्रेमींसाठी माहिती तंत्रज्ञानाद्वारे सावरकर विचारांचा खजिनाच अवघ्या विश्वासाठी उपलब्ध करून दिला आहे.



स्वातंत्र्याचा लढा लढता लढता सावरकर यांनी त्यांचे विविध विषयांवरचे विचार पुस्तक रूपाने प्रकाशित केलेले आहेत. मराठी भाषेपासून ते हिंदुत्वापर्यंत आणि अंधश्रद्धेपासून स्वातंत्र्य चळवळीपर्यंतच्या विविध विषयांवर सावरकरांनी लेखन केले आहे. त्यात अंधश्रद्धा निर्मूलन, मराठी भाषेचे शुद्धीकरण, आता मृत्यूचे स्वागत करा, अंदमानाच्या अंधेरीतून, असेन्शियल ऑफ हिंदुत्वा आदी सावरकरांची ३८ पुस्तके www.bookganga.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

हिंदू महासभेच्या नेत्या हिमानी सावरकर यांनी बुकगंगा डॉट कॉमचे मंदार जोगळेकर यांना ही सर्व पुस्तके दिली आहेत. ही पुस्तके संकेतस्थळावरून विकत घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे जोगळेकर यांनी सांगितले.

**चार दुर्मिळ पुस्तके**

हिंदुपादशाही, हिंदुराष्ट्रदर्शन, ऐतिहासिक निवेदने आणि १९५७ चे स्वातंत्र्य समर (४ खंड) आदी सावरकर यांची चार दुर्मिळ पुस्तके या संकेतस्थळावर उपलब्ध झाल्याने सावरकरप्रेमींसाठी ही पुस्तके पर्वणीच ठरणार आहेत.